| | |
|---|---|
| MHKO140012492021 | **नियमित दिवाणी दावा क्र.१८३/२०२१**<br>उत्तम लाडू पवार वगैरे.<br>**विरुद्ध**<br>महादेव सातेरी तोडगल. |

**नियमित दिवाणी मुकदमा क्र.१८३/२०२१ मधील नि.क्र.१५ वरील आदेश**

१. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज हा विना कैफियत आदेश रद्द करण्यासाठी व त्यांची कैफियत तसेच प्रतिदावा स्विकारण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जावर वादीतर्फे म्हणणे दाखल करुन जोरदार हरकत घेण्यात आलेली आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. प्रतिवादी यांनी विहित मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल न केल्याने नियमानुसार दावा विना कैफियत व म्हणणे पुढे चालविण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी वकिलांमार्फत हजर झाले. त्यानंतर वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये तडजोडीची बैठक झाली व त्यामध्ये वाद संपुष्ठात आणण्याचे ठरले आणि त्यानुसार दावा निकाली करुन घेण्याचे ठरले. तदनंतर तडजोड पुरसिस करण्यात आली परंतू वादींनी त्यानंतर तडजोड करण्याची नाही असे सांगितले. सदर तडजोडीस लागलेल्या कालावधीमुळे प्रतिवादीस मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादीने जाणून बुजून विलंब केलेला नाही. अर्ज नामंजूर केल्यावर प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. याउलट, वादीचे नुकसान होणार नाही. म्हणून त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. सदर अर्जावरच वादीने त्यांचे म्हणणे देवून अर्जास प्रखर हरकत घेवुन अर्जातील कथन खोटे असल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा हा निरंतर व आदेशात्मक मनाई आदेशा करीता दाखल केला असल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी हजर

होऊनही मुदतीत कैफियत दिली नाही. अर्जातील कारणांचा विचार करता तसेच प्रतिवादी यांना नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने त्यांची कैफियत व प्रतिदावा मांडण्याची संधी दिल्यावर प्रकरण गुणदोषावर न्यायनिर्णयित होण्यास मदत होणार आहे. तसेच उभय पक्षकारांमध्ये वादाचे एकाच दाव्यामध्ये निराकारण होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित राहील असे मला वाटते. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

०१. प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/– कॉस्ट वादी यांना देण्याच्या पुर्व अटीवर त्यांची कैफियत व प्रतिदावा दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

Digitally signed by CHARUDATT UDDHAV SHIPKULE
Date: 2023.01.18 16:45:09 +0630

ठिकाण–चंदगड.
दिनांक–१८.०१.२०२३.

(चारुदत्त उद्धव शिपकुले)
सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर चंदगड.